Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- VI JUNE 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# धृपद : संकल्पना आणि स्वरुप

प्राचार्य डॉ. राम बोरगांवकर
सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर

भारतीय संगीतात ख्याल गायकी प्रचार पावण्यापूर्वी भारतीय संगीत धृपद–धमार गायकीत सामावलेले होते. ही त्या काळातील अत्यंत लोकप्रिय गायन शैली होती. धृपदाचे काव्य वीर, श्रृंगार व शांत रसाला पोषक असे. एक जोरदार गायनशैली म्हणून गायन मान्यता पावले होते. मर्दानी आवाजात जोरदार पद्धतीने धृपदाचे गायन होई. गायनासाठी विशेष करुन चौताल सुरफक्ता, झपताल, रुद्रताल, ब्रह्मताल हे ताल वापरतात. तालासाठी मृदुंग हे वाद्यच धृपदासाठी वापरणे योग्य ठरते. धृपदात तानाचा प्रकार येत नाही. त्याऐवजी बोलताना व गीताचे दुगून, तीगुन वगैरे लयीचे प्रकार केले जातात.

धृपदाच्या गीतांचे चार भाग असतात. (१) अस्ताई (२) अंतरा (३) संचारी व (४) अभोग

(१) अस्ताई :– (स्थायी) गीताच्या पुर्वार्धास अस्ताई म्हणतात.

(२) अंतरा :– गीताच्या उत्तरार्धास अंतरा म्हणतात.

(३) संचारी :– धृपदाचे दुसऱ्या अंतरास संचारी म्हणतात.

(४) अभोग :– धृपदाचे तिसऱ्या अंतरास अभोग असे म्हणतात.

सध्या भारतीय संगीतात प्रचारात असलेल्या ख्यालामध्ये फक्त पहिले दोन भाग (१) अस्ताई (२) अंतरा हे राग स्वरुप स्पष्ट करण्यास पुरेसे असतात.

भारतीय संगीतात गेले १५० ते २०० वर्षात ख्याल गायकी प्रचार पावून आज राग संगीताचे गायन पूर्णपणे ख्याल गायकीने व्यापून टाकले असून धृपद गायकी जवळजवळ पूर्णपणे लोप पावली आहे.

**धृपद बानी**

धृपद गायक कलावंताच्या धृपद गाण्याच्या भिन्न भिन्न शैलीवरुन धृपद गायकीचे चार प्रकार त्या कालखंडात प्रसिद्ध पावले होते त्यास धृपद बानी असे म्हटले जाते. असे प्रकार पुढीलप्रमाणे

(१) गौबरहार बानी (२) खंडहार बानी

(३) डागुर बानी (४) नौहार बानी.

**(१) गौबरहार (गौडीय) बानी** :– मोगल बादशहा अकबराच्या कारकिर्दीत होऊन गेलेला विख्यात गायक तानसेन याच्या धृपद गायन शैलीला गौबरहार किंवा गौडीय बानी असे म्हणत. कारण तानसेन हा मुळचा गौड ब्राह्मण, त्यामुळे या गायनशैलीस गौडीय किंवा गौबरहार बानी हे नाव पडले. हिलाच शुद्ध वाणी असेही म्हणतात. मोठी प्रसाद्युक्त व शांत रसाचा परिपोष करणारी शैली हे या बानीचे वैशिष्ट्य. या बानीची लय धीरगंभीर असून स्पष्टता हे या बानीचे प्रधान लक्षण होय. त्यामुळे स्वर सुनिश्चित स्वरुपात प्रकट होतो. संगीताचा आत्मा असलेला रसाविष्कार या बानीत मोठ्या प्रमाणात साधला जात असल्याने ही बानी संगीताची प्रधान बानी मानली जाऊ लागली.

**(२) खंडारबानी** :– अकबराचे कारकिर्दीत एक श्रेष्ठ बीनकार हाऊन गेला. त्याचे नाव राजा समोखसिंह. खंडहार नावाच्या त्यांच्या निवासस्थानावरुन त्याच्या धृपद बानीस खंडारबानी हे नाव पडले. तसेच या गायन शैलीचे वैशिष्ट्य म्हणजे खंड्युक्त गायन असल्याने त्यावरुनही खंडारबानी हे नाव पडले असावे. या शैलीचे प्रधान वैशिष्ट्य म्हणजे स्वरांचे विविध खंड करुन गायन केले जाते. स्वर सरळ मार्गाने घेतला जात नाही. याचे गायन वेगवान पद्धतीने, गमकयुक्त स्वर आंदोलने घेत

केले जाते. विलंबितख द्रुत आलाप पद्धतीनेही गायन शैली गायली जाते.

**(३) डागुर बानी :–** अकबर बादशहाचे दरबारातील आणखी एक प्रसिद्ध गायक व्रजचंद हा डागुर या गावाचा राहणारा होता. त्याच्या गायन शैलीस त्या गावाच्या नावाने म्हणजे डागुर बानी म्हणून संबोधले जाते. या बानीचे वैशिष्ट्य म्हणजे वैचित्र्यपूर्ण व रहस्यमय भाव प्रकट करणे. एका स्वराचा दुसऱ्या स्वरांशी होणारा मिलाप वैचित्र्यपूर्ण पद्धतीने केला जातो.

**(४) नौहार बानी :–** अकबराचे दरबारातील आणखी एक प्रसिद्ध धृपदिया, श्रीचंद रजपुत याचे निवासस्थान नौहार गाव. या निवासस्थानावरुन त्याचे गायन शैलीस नौहार बानी हे नाव पडले. एका स्वरावरुन पुढल्या स्वरावर जाताना मध्ये दोन–तीन स्वर गाळून पुढला स्वर घेणे हे या बानीचे वैशिष्ट्य. या गायन शैलीत रसाचा परिपोष विशेष होत नाही. तथापि एक आश्चर्यकारक गायन शैली म्हणून या बानीचा उल्लेख करता येईल.

**धृपद धमार :**

हा धृपद गायकीचाच एक प्रकार असून जी धृपदे धमार नावाच्या चौदा मात्रांच्या तालात गातात त्यांना धृपद – धमार असे म्हणतात. यातील काव्य श्रृंगार रसपोषक असतो. तसेच धृपदाइतके गंभीर पण नसते. लयीचे विविध प्रकार व बोलतानांच्या अंगाने गायन हे या गीतप्रकाराचे वैशिष्ट्य.

**धृपद, धमार गायन पद्धतीत होणारे लयीचे प्रकार**

धृपद गायन शैलीचे वैशिष्ट्य असे आहे की याचे गायन लयीचे विविध प्रकार घेऊन केले जाते. दुगून, तिगुन, चौपट लय, आडलय, कुआडलय, बिआडलय इत्यादी लयीचे प्रकार गीत गायनात दाखवणे हे धृपदाचे वैशिष्ट्य.

धृपदामधील गीतांचे अस्ताई, अंतरा कितीही आवर्तनाचे असोत वरील लयीचे प्रकारात ते गायले जातात. उदाहरणार्थ धृपद गीतामधील अस्ताई दोन आवर्तनाची म्हणजे २४ मात्रांची असेल किंवा धमाराची अस्ताई दोन आवर्तनाची म्हणजे २८ मात्रांची असेल तर लयीचे विभिन्न प्रकार पुढीलप्रमाणे होतील.

दुगून :– दुगून म्हणजे दुप्पट लय. एका मात्रेत २ मात्रा गाणे. दोन आवर्तनाचे धृपद असेल तर (म्हणजे २४ मात्रांचे) त्यातील १२ मात्रेतच २४ मात्रांचे गायन केले जाते.

तिगुन :– तिगुन म्हणजे तिप्पट लय. एका मात्रेत तीन मात्रा गाणे. म्हणजेच १२ मात्रांमध्ये ३६ मात्रांचे गायन करणे.

चौगुन :– चौगुन म्हणजे चौपट. एका मात्रेत चार मात्रा गाणे. म्हणजे धृपदाचे १२ मात्रांमध्ये ४८ मात्रांचे गायन करणे.

आडलय :– दीडपट लय म्हणजे आडलय. तीन मात्रांत दोन मात्रा गाणे. म्हणजे धृपदाच्या १२ मात्रेत ८ मात्रांचे गायन करणे.

**प्रबंध**

धमार ही गायन शैली प्रचारात येण्यापूर्वी हा गीत प्रकार राग गायनात प्रचारात होता. प्रबंध याचा अर्थ स्वर ताल युक्त रचना असा मानला जातो. निरनिराळ्या चीजांच्या बंदिशी म्हणजे प्रबंधच. हा गीत प्रकार आज पूर्णपणे लुप्त झाला असल्याने, त्याचे एखादे उदाहरण देणे सुद्धा शक्य नाही.

गीतावयव–प्राचीन काळी जी प्रबंध गीते गात त्यांचे चार भाग असत. त्यांना गीतावयव म्हणत.

१) उद्ग्राह २) मेलापक ३) धृव ४) अभोग

१) उद्ग्राह :– गीताचा प्रारंभ ज्या भागाने होत असे त्यास उद्ग्राह असे म्हणत.

२) मेलापक :– दुसऱ्या भागास मेलापक म्हणत.

३) धृव :– गीताच्या तिसऱ्या भागास धृप असे म्हणत. प्रत्येक गीतात हा भाग कायम स्वरुपाचा असे म्हणूनच त्याला धृव म्हणत.

४) अभोग :– गीताच्या चौथ्या भागास अभोग म्हणत असत. सेथेच प्रबंध गीत पूर्ण होत असे.

तथापि काही प्रबंध पाच भागांचे असत तेव्हा त्यातील पाचव्या भागास अंतरा म्हणत.

जे प्रबंध तीन अवयवांचे असत त्यात मेलापक येत नसे. फक्त १) उद्ग्राह २) धृव ३) अभोग असे भाग येत. जे प्रबंध दोन अवयवांचे असत त्यात

मेलापक व अभोग येत नसे. केवळ १) उद्ग्राह २) धृव. एवढेच अवयव असत. याचा अर्थ प्रत्येक प्रबंधात धृव हा अवयव कायम असतात.

धृपदात ज्या लयकारी आपण केल्या किंवा केल्या जात होत्या त्या सर्व लयकारीन्चा ख्याल गायकीत सुद्धा पूर्णपणे उपयोग केला जाऊ शकतो. व तो करणे शक्य सुद्धा आहे. हे करताना लयकारीचा अीयास व तालावरील हुकुमत यांची गरज आहे. वाद्य वादनात लयकारी अंगाने कलेले काम आजही आपणास पहावयास मिळते. सतार वादन, सारंगी वादन, सनई, बासरी इत्यादी स्वर वादनात तंतू व सुषिर वाद्याच्या वादनात, तालवाद्यांमध्ये मृदुंग, तबला इत्यादी वादनात जे लयकारी अंगाने केलेले काम आपण ऐकतो, अनुभवतो त्या तुलनेत ते काम ख्याल गायकीत केलेले आढळत नाही.

फार तर फार आडलयीची एखदीच तान ख्यालात ऐकावयास मिळते. वास्तविक लयकारीचा उपयोग ख्यालात करणे शक्य आहे व ते केल्याने ख्यालाची समृद्धी आणखी वृन्धिगत होऊन कल्पनाशक्तीला आणखी वाव मिळेल व त्यामुळे मानवीय बुद्धीचा बुध्यांक आणखी वृन्धिगत होण्यास मदत होईल.

## संदर्भ ग्रंथ

1) मुक्त संगीत संवाद -संपादक डॉ. श्रीराम संगोराम

2) आस्वादक संगीत समीक्षा - डॉ. श्रीराम संगोराम, राजहंस प्रकाशन,पुणे

3) सुरसंगीत - गानयोगिनी धोंडूताई कुलकर्णी

4)संगीताचे सौंदर्यशास्त्र - डॉ. अशोक रानडे

5) स्वरार्थरमणी - किशोरी अमोणकर